**प्रकरण – २**

**(नियमावली- I)**

**विभागाची कार्यप्रणाली व कर्तव्ये याबाबतचा तपशील**

2.1 **उद्देश / हेतू :**

बृहन्मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यासाठी विविध प्रकारच्या सुविधा या विभागाकडून देण्यात येतात. तसेच मुंबई शहरामधील रस्त्यांवरील अनधिकृत पार्किंग व त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी टाळण्याकरिता 'सशुल्क वाहनतळ' योजनेअंतर्गत रस्त्यावरील सार्वजनिक व सुविधा वाहनतळ चालविण्यासाठी निविदा काढून कंत्राटदाराची नेमणूक करून विभाग कार्यालयास अंमलबजावणीसाठी पाठविणे.

2.2 **खात्याचे काम**

1. अस्तित्वात असलेल्या रस्त्यावर रस्ता रेषा विहीत करणे, सार्वजनिक रस्ते जाहीर करणे.
2. वाहतूक पोलिसांसोबत विचार विनिमय करून रस्त्यावर स्टडस् बसविणे.
3. वाहतूक नियंत्रकाची उभारणी व त्यांचे परिरक्षण करणे.
4. नियमित रेषा / रस्ता रेषा यांच्या सिमांकनाबाबत संबंधित विकासक / वास्तूशास्त्रज्ञ यांचे सहाय्यक अभियंता (सर्वे) विभागाकडून प्राप्त होणा-या प्रस्तावांना अभिप्राय देणे.
5. विभागीय कार्यालयांशी विचार विनिमय करून रस्त्यांवर मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन, रिलायन्स एनर्जी आणि महाराष्ट्र राज्य विदयुत महावितरण महामंडळ यांच्यामार्फत दिवाबत्तीची सोय करणे.
6. "सशुल्क वाहनतळ" योजनेच्या निविदा मागवून विभाग कार्यालयास अंमलबजावणीसाठी पाठविणे.
7. वाहतूक बेटांचे आरेखन आणि पदपथाबाबतचे अभिप्राय देणे.
8. सुरळीत वाहतूकीसाठी वाहतूक मार्गदर्शक, सूचना फलकांची उभारणी करणे.
9. आय.आर.सी. प्रमाणे नाक्यावरील वक्रतेच्या संरचनेच्या प्रस्तावांना अभिप्राय देऊन मंजूरीसाठी सादर करणे.
10. नवीन गतिरोधक उभारण्याबाबतच्या प्रस्तावाची छाननी करुन वाहतूक पोलीस यांचेकडे अभिप्रायासाठी निर्गमीत करणे.

**2.3 उप प्रमुख अभियंता (वाहतूक) विभागाकडून पुरविण्यात येणा-या सुविधा.**

1. "सशुल्क वाहनतळ" योजना -

अनेक रस्त्यांवर आणि वाहतूक बेटांमध्ये रस्त्यांवरील सशुल्क वाहनतळांकरीता निविदा मागवून विभाग कार्यालयास अंमलबजावणीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. तसेच सार्वजनिक वाहनतळ आणि महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आलेल्या सुविधा वाहनतळांमध्ये सशुल्क वाहनतळाकरीता निविदा मागवून विभाग कार्यालयास अंमलबजावणीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.

2. रस्त्यांवर दिवाबत्तीची सोय करणे व परिरक्षण करणे -

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमधील सर्व रस्त्यांवर दिवाबत्तीची सोय करणे. विभाग कार्यालयांबरोबर सल्लामसलत करुन विकास नियोजन रस्त्यांवर मे .मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन,

मे.रिलायन्स एनर्जी आणि मे. एम.एस.ई.डी.सी यांच्यामार्फत भाडेतत्त्वावर दिवाबत्तीची सोय केली जाते व त्याची संबंधित कंपन्यांकडून योग्य आकार देऊन देखभाल केली जाते.

3. रस्ते सुरक्षा दुभाजक / कर्बस्टोन इ.च्या रंगकामासाठी रंग पुरविणे

रस्त्यांवरील खुणा, दुभाजक / कर्बस्टोन इ. च्या रंगकामाकरीता महानगरपालिकेच्या सर्व विभागांना रंग पुरविणे तसेच पदपथ बांधणे, रस्ता दुभाजक बांधणे आणि रस्त्यांचे सुशोभिकरण इ. कामे करण्यासाठी अभिप्राय देणे.

4. विविध रस्त्यांवर रस्ते मार्गदर्शक फलक बसविणे

रस्ते नामफलक, दिशादर्शक फलक / अनिवार्य फलक बसविणे. बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीमधील वाहतूक सुरळीत राखण्याकरीता विविध ठिकाणी अनिवार्य फलक, सावधनतेचा इशारा देणारे फलक, दिशादर्शक फलक आणि रस्ते व चौकांची नावे दर्शविणारे फलक लावण्यात येतात.

2.4 संघटनात्मक मांडणी-

अभियांत्रिकी संवर्ग

| अ. क्र. | संवर्ग | एकूण पदे |
|---|---|---|
| 1. | उप प्रमुख अभियंता | 01 |
| 2. | कार्यकारी अभियंता | 04 |
| 3. | सहाय्यक अभियंता | 09 |
| 4. | दुय्यम अभियंता | 25 |
| 5. | कनिष्ठ अभियंता | 12 |

प्रशासकीय संवर्ग

| अ. क्र. | संवर्ग | एकूण पदे |
|---|---|---|
| 1. | प्रशासकीय अधिकारी | 01 |
| 2. | वरिष्ठ लघुलेखक | 01 |
| 3. | मुख्य लिपिक | 04 |
| 4. | लिपिक | 11 |
| 5. | आरेखक | 02 |
| 6. | अनुरेखक | 09 |
| 7. | वाहतूक प्रगणक | 17 |
| 8. | नाईक | 01 |
| 9. | शिपाई | 06 |